**वि.दि.मु.नं.२६९/२०२३ (नि.३२)**

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास वादी तर्फे ॲड. श्री.व्ही. ई. भोसले**

१) हे म्हणणे खरे नाही की माझे पती मयत झाल्यानंतर मी एमएसईबी कडे नुकसान भरपाई मिळणेकरीता अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी एमएसईबीने मला एकदा रक्कम रु.२०,०००/- व एकदा रु.३,८०,०००/- असे एकुण ४,००,०००/- दिले होते. हे म्हणणे खरे नाही की ते रु.४,००,०००/- मी अर्ज केल्यानंतरच मला मिळाले. मला रुपये ३,८०,०००/- चेकने दिले होते व २०,०००/- रुपये त्यादिवशी लगेच दिले होते. हे म्हणणे खरे नाही की मला एमएसईबी ने रक्कम रु.४,००,०००/- दिले असल्याने एमएसईबी मला कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला रक्कम रु.३४,४८८/- एवढा पगार होता हे दाखविण्याकरीता माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला रक्कम रु.३४,४८८/- एवढा पगार होता हे मी खोटे सांगत आहे.

२) आमच्याकडे एक एकर शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामध्ये आम्ही ऊसाचे पीक घेतो हे दाखविणारा माझ्या तोंडी शब्दाशिवाय कोणताही पुरावा नाही. त्याबाबतचा पुरावा दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आमच्या शेतात ऊस करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की शेतीतुन दरवर्षी रक्कम रु.४०,०००/- उत्पन्न मिळते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की मला शेतीशिवाय दुसरे कोणतेही उत्पन्न नाही हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात दाखल केलेला नाही.

३) हे म्हणणे खरे नाही की मला एमएसईबीकडुन ४,००,०००/- रुपये नुकसान भरपाई मिळालेली असताना जादा पैसे मिळावे या लोभाकरीता मी खोटा दावा दाखल केला

आहे. हे म्हणणे खरे नाही की मला एमएसईबी कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे पती एमएसईबीच्या चुकीमुळे मयत झालेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की अपघात हा माझ्या पतीच्या चुकीमुळे झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासात वीज वाहिनीच्या व्यवस्थापनेबाबत जो मजकुर नमुद केला आहे तो चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की जबाब कसा दयायचा हे मला माझ्या वकिलांनी सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २९.०३.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
वाई.